**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हमीद हसनभाई शेख
चावडी चौक, आळंदी देवाची, ता.खेड, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, विधानभवन, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
आळंदी नगरपरिषद, आळंदी, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२३६ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन),
विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, विधानभवन, पुणे श्री.प्र.सं.पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याधिकारी,
आळंदी नगरपरिषद, आळंदी, जि.पुणे श्री.पं.अ.वंजेरी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.४.२००७ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>चावडी चौक परिसरात गिरणी व डंक व्यवसायाला कोणाला परवानगी दिली याबाबत. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि.१.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

आळंदीमधील गिरणी व डंक व्यवसायाला दिलेल्या परवानगीबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.हमीद हसनभाई शेख यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिली नाही, म्हणून श्री.शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे अपील केले. माहिती दिल्याचे मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले, मात्र 'कागदपत्रे आढळून येत नाहीत,' अशी माहिती दिलेली आहे. ही 'माहिती' होत नाही. कार्यालयीन अभिलेखात नोंद आढळत नसल्यास संबंधितांकडे विचारणा करुन प्रत प्राप्त करुन घ्यावी व अभिलेख अद्ययावत करावा, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील मान्य केले व माहिती देण्याचा आदेश दि.५.४.२००७ रोजी दिला. त्यानंतरही वारंवार स्मरण देऊनसुध्दा तत्कालीन मुख्याधिकारी श्री.संजीव निवृत्ती ओहोळ यांनी माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी श्री.शेख यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपिलात केली आहे.

श्री.शेख यांनी मागणी केलेल्या परिसरातील त्या व्यवसायांना दिलेल्या परवान्याची प्रत त्यांना त्वरित देण्यात येईल, असे निवेदन विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.प्र.सं.पाटील यांनी केले.

अपीलकर्त्यास मुदतीत माहिती का दिली नाही, याबाबतचा खुलासा आयोगाने दि.३१.१०.२००८ च्या पत्रान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी

नगरपरिषद यांच्याकडून मागविला होता. तथापि त्यांनी कोणताही खुलासा केला नाही, ही बाब गंभीर आहे. मुळात विहित मुदतीत माहिती न देणे, अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतरही त्यानुसार कार्यवाही न करणे व आयोगाच्या विचारणेनंतरही कोणताही खुलासा न करणे ही श्री.ओहोळ यांची कृती नियमभंगाची व कर्तव्यपालन न करण्याची निदर्शक आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री.संजीव निवृत्ती ओहोळ हे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री.संजीव निवृत्ती ओहोळ यांना रुपये २५००० शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती वसूल करुन ती दि.१०.११.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) ' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही श्री.प्र.सं.पाटील, उपआयुक्त(सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांनी करुन, तसेच याबाबत त्यांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अभिलेखात नोंदी घेऊन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) अपीलकर्त्यास संबंधित व्यवसायांच्या परवान्याच्या प्रती देण्याच्या कार्यवाहीचा अहवाल विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद श्री.पं.अ.बंजेरी यांनी दि.५.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २५ .१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. दादाभाऊ भगवंता गुंजाळ
मु. रानमळा, पो. वेल्हा, ता. जुन्नर,
जि. पुणे ४१२४१०

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, जुन्नर, जि. पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत रानमळा, पो. वेल्हा, ता. जुन्नर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२४९ / २००९ / पुणे |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३.८.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - ग्रामपंचायत, रानमळाच्या ग्रामसभा, मासिक सभा ठरावांच्या छायाप्रति, लेखापरीक्षण अहवाल, सर्व बँक खाते उतारे, ग्रामपंचायत सदस्य हजेरी पत्रक, वार्षिक ग्रामपंचायत वसुली व शासकीय निधी जमा-खर्चाची माहिती. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. दादाभाऊ भगवंता गुंजाळ यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी

यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

स्थळ :- पुणे
दि.३१-१०-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.संतु तुकाराम भारती
३६७, सोमवार पेठ, पुणे -११ **अपीलकर्ता**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
विभागीय कार्यालय क्र.२,
पुणे महानगरपालिका, ढोले पाटील रोड, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** क्षेत्रिय अधिकारी,
संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे -६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२६९/२००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.०६.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.०७.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२०.०८.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.३१.०८.२००९ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>प्रॉपर्टी टॅक्सला नावाची नोंद होण्यासाठी अपीलकर्त्याने दि.७.०८.२००८ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने विधी सल्लागारांनी दिलेल्या लेखी अभिप्रायाची प्रत, तसेच विधी सल्लागारांच्या सल्ल्यानुसार घेण्यात आलेल्या प्रशासकीय निर्णयाच्या कार्यालयीन टिप्पणीच्या व नोंदीच्या प्रती. | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. संतु तुकाराम भारती यांनी प्रॉपर्टी टॅक्सला त्यांच्या नावाची नोंद घेण्यासाठी आवश्यक माहिती प्राप्त न झाल्याने राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दरम्यानच्या काळात सर्व मुद्दयांची पूर्तता जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी केली असल्याने आयोगाकडील अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही करु नये, असे अपीलकर्त्याने आयोगास दि.१४.१०.२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : २३-१०-२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. एकनाथ कृष्णाराव रंगारी
फ्लॅट नं.२८, बि.नं., इंद्रप्रस्थनगर, स.नं.४ अे/८,
हडपसर, गाडीतळ, पुणे ४११ ०२८ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ -४, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त,
वानवडी विभाग, पुणे -४०

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२७६/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २७.१०.२००७ |
| **३.** | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** श्री. एकनाथ कृष्णाराव रंगारी
फ्लॅट नं.२८, बि.नं., इंद्रप्रस्थनगर, स.नं.४ अे/८,
हडपसर, गाडीतळ, पुणे ४११ ०२८

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -४, पुणे-१ प्रतिनिधी श्री.मो.रा.कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, पुणे -४० श्री.व्ही.टी.पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.३०.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०२.०१.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने आयोजित केलेल्या दि. १६.७.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'स जन माहिती अधिकारी हजर होते. एकमत झाले नाही, त्यामुळे सुनावणी घेतली. सुनावणीला अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी हे हजर नसल्यामुळे दि.२७.१०.२००७ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता ॲड.एकनाथ कृष्णराव रंगारी यांनी सोसायटीत झालेल्या भांडणाच्या अनुषंगाने केलेल्या तक्रारीवर पोलिसांनी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती मागितली होती. आपण दखलपात्र गुन्हा करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी केली होती. परंतु कायद्यानुसार एफआयआर दाखल करून आरोपींवर कारवाई करणे आवश्यक असताना पोलिसांनी केली नाही व आपल्याला योग्य माहिती दिली गेली नाही, असे लेखी प्रतिपादन ॲड.रंगारी यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनामध्ये केले आहे.

ॲड.रंगारी यांनी केलेल्या अर्जावर एफआयआर दाखल करण्यात आला नसल्यामुळे त्याची प्रत देता येत नसल्याचे त्यांना विहित मुदतीत कळविण्यात आले. त्यांच्या सन २००६ मधील मूळ तक्रारीनंतर जाबजबाब घेण्यात आले. त्याच्या प्रतीही त्यांना देण्यात आल्या असून संबंधितांवर चॅप्टर केस दाखल केली असून त्याबाबतची सर्व माहितीही दिली आहे, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, पुणे श्री.व्ही.टी.पवार यांनी केले.

ॲड.रंगारी यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. आपल्या मूळ अर्जानुसार हडपसर पोलीस ठाण्याने कायद्यानुसार योग्य कारवाई केलेली नाही, अशी त्यांची तक्रार असून त्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयासह विविध न्यायालयांचे निवाडे व कायदे यांचा आधार आपल्या

प्रतिपादनाच्या पृष्ट्यर्थ त्यांनी दिला आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कक्षेत या मागणीची दखल घेता येणार नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे
मु. पो. केंदूर, ता. शिरुर,
जि. पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था (पुणे), साखर संकुल, शिवाजीनगर,
पुणे - ४११००५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, शिरुर, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३०२ / २००९ / पुणे |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने माहिती-मागणी अर्जातील मागणीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. पांडुरंग दत्तात्रय थिटे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३१ - १० -२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. रविंद्र कुमार
३७, लॉयर चेंबर्स, सुप्रीम कोर्ट कंपाऊंड,
नवी दिल्ली - ११० ००१ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस उपायुक्त (गुन्हे )
पोलीस आयुक्त कार्यालय, जीपीओ जवळ, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस उपायुक्त (गुन्हे )
पोलीस आयुक्त कार्यालय, जीपीओ जवळ, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक पोलीस उपायुक्त (गुन्हे )
पोलीस आयुक्त कार्यालय, जीपीओ जवळ, पुणे-१ तर्फे प्रतिनिधी
श्री. क्रांतीकुमार पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १५.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३०.३.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

हसनअली खान यांच्या विरुध्द पुणे पोलिसांकडून दि. १० व ११ मार्च २००७ रोजी कोणता तपास करण्यात आला, तपास करण्यात आला असल्यास दैनंदिन नोंदीवहीची प्रत, तसेच गुन्हे शाखेने त्यांना सी.आर.पी.सी. कलम १६० अन्वये नोटीस अदा करण्यात आली असल्यास त्या नोटिशीची प्रत, पोलिसांनी त्यांच्याकडून अगर त्यांच्या निवासस्थानामधून कोणते कागदपत्र व फोटोग्रॉफ जप्त करून घेतले त्याच्या छायांकित प्रती, तसेच पत्रकारांना दिलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती इ.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ व दि. २६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता उपस्थित नसल्याने दि. १९.६.२००९ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

एका प्रकरणाच्या तपासाच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता ॲड. रविंद्र कुमार यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे यांच्याकडे मागितली होती. परंतु माहिती चुकीची व इंग्रजीऐवजी मराठीतून दिली, या कारणावरुन ॲड. रविंद्र कुमार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

अपीलकर्ता नवी दिल्ली येथील असून त्यांनी मागितलेली माहिती दिली आहे. आधी ती मराठीतून देण्यात आली, मात्र त्यांनी कळविल्यानुसार इंग्रजीमध्ये दि. २१.१०.२००८ रोजी रजिस्टर्ड टपालाने पाठविली, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, (गुन्हे -१), पुणे श्री. संग्रामसिंह निशाणदार यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात संबंधित माहितीच्या प्रतीसह नोंदविले होते. त्याचाच पुनरुच्चार त्यांचे प्रतिनिधी सहाययक पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, पुणे श्री. क्रांतीकुमार पाटील यांनी सुनावणीच्या वेळी केला. ॲड. रविंद्रकुमार यांनी काही कायदेशीर तरतुदींबाबतचे व तपासाविषयीचे स्पष्टीकरण विचारले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये ते देणे शक्य नाही, असेही त्यांनी नमूद केले.

ॲड. रविंद्रकुमार यांच्या मूळ अर्जानुसार देय माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. बादशहा हुसेन मुलाणी
मु.पो. वडूज, ता. खटाव, जि. सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
वडूज, ता. खटाव, जि. सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
१. पेडगाव विकास सेवा सोसायटी लि.,
२. भोसरे विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी लि.,
पेडगाव, ता. खटाव, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४, १३५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. बादशहा हुसेन मुलाणी
मु.पो. वडूज, ता. खटाव, जि. सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव,
१. पेडगाव विकास सेवा सोसायटी लि.,
२. भोसरे विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटी लि.,
पेडगाव, ता. खटाव, जि. सातारा
श्री. धनाजी बुवासाहेब देशमुख

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १३४ / सातारा | १९.८.२००६ | -- | १८.९.२००६ | १६.१०.२००६ |
| १३५ / सातारा | १९.८.२००६ | २१.८.२००६ | १८.९.२००६ | १६.१०.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

दोन विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्थांकडे आपण मागितलेली माहिती संस्थांच्या सचिवांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडूज, ता. खटाव, जि. सातारा यांनी अपिलाची सुनावणी घेतली नाही व ४५ दिवसांत निर्णय दिला नाही. सन १९७६ पासूनचे ताळेबंद आपण मागितल्याचे सांगितले जाते, तसे आपण मागितले नाहीत. सन १९८५ किंवा एक एक वर्षाचे ताळेबंद मागितले आहेत. नोकरीत आपल्यावर अन्याय झाला. आपल्याला पुन्हा कामावर घेतले असले तरी वेतनश्रेणी मिळालेली नाही. दप्तरात खाडाखोड करुन आपण अपहार केल्याचे दाखविले व रक्कम वसूल केली. हा अन्याय दूर करण्यासाठी आपण झगडत असून त्यासाठी माहिती मिळणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. बादशहा हुसेन मुलाणी यांनी केले.

श्री. मुलाणी यांनी दि.१.४.२००० ते दि.३१.३.२००५ या काळातील माहिती मागितली होती. संस्थेत सचिव म्हणून ते काम करीत असताना त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांचीच माहिती मागितली आहे. कार्यालयात उपलब्ध असलेली कागदपत्रे त्यांना देण्यात आली आहेत. सन १९७६ पासूनच्या ताळेबंदाची मागणी त्यांनी केली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सचिव, भोसरे व पेडगाव, विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्था श्री. धनाजी बुआसाहेब देशमुख यांनी केले.

श्री. मुलाणी यांनी केलेल्या अपिलांची सुनावणी घेण्यात आली. श्री. मुलाणी यांनी नक्कल शुल्क भरणा करुन संस्थेच्या सचिवांकडून माहिती अनुक्रमे २० व २१ दिवसांत घ्यावी, असा आदेश दोन अपिलांत दिला. संस्थेच्या सचिवांनी कळविल्यानुसार श्री. मुलाणी यांनी नक्कल शुल्क भरले असते तर तेव्हाच त्यांना माहिती देता आली असती, असे सुनावणीच्या दरम्यान स्पष्ट झाले होते, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडूज, ता. खटाव सौ. विजया बाबर यांनी सादर केले.

श्री. मुलाणी यांनी मागितलेल्या माहितीबाबत संस्थेच्या सचिवांनी पत्रव्यवहार केला असल्याचे, तसेच सन १९७६ पासूनच्या ताळेबंदाचीही मागणी केली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मात्र आपल्याला ही पत्रे मिळालेली नाहीत, असे श्री. मुलाणी यांचे म्हणणे आहे. अपिलांची सुनावणी झाली नाही, असे श्री. मुलाणी यांनी म्हटले असले, तरी सुनावणीला ते उपस्थित असल्याचे व त्यांनी त्यांचे म्हणणे मांडल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. हे लक्षात घेता श्री. मुलाणी यांनी

जबाबदारीपूर्वक विधाने करणे आवश्यक आहे, याची जाणीव त्यांना देण्यात येत आहे. मात्र त्यांना पूर्ण माहिती मिळालेली नाही, म्हणून जन माहिती अधिकारी तथा संस्थेचे सचिव व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, वडूज यांच्या कार्यालयात जाऊन अभिलेखांचे अवलोकन करुन आवश्यक माहिती त्यांना घेता आली पाहिजे. तसे अवलोकन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी करू द्यावे व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले अंशत: मान्य करण्यात येत आहेत.

२. आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. २०.११.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि. ३१.१०.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. सदाशिव तुकाराम येजरे
शिवकुंज अपार्टमेंट, राजारामपूरी,
दूसरी गल्ली (पूर्व), कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** विस्तार अधिकारी,
पंचायत समिती भुदरगड, जि. कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** ग्रामसेवक,
ग्रामपंचायत बेगवडे, ता. भुदरगड, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६२ / २००९ / कोल्हापूर |
| २ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.६.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - मौजे बेगवडे ग्रामपंचायत इमारतीच्या जागेच्या मालकी हक्काची कागदपत्रे. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. सदाशिव तुकाराम येजरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ :- पुणे**
**दि.०९-१०-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.गजानन वासुदेव करमरकर
सुगम, ६१/२४, एरंडवणा, भारती निवास हौ.सो., पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८१ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.गजानन वासुदेव करमरकर
सुगम, ६१/२४, एरंडवणा, भारती निवास हौ.सो., पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.मदन रामचंद्र आढारी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.अनिरुध्द घनःश्याम पावसकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १२.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गजानन वासुदेव करमरकर यांना माहिती देण्यात आली आहे. त्यांनी मागितलेल्या माहितीनुसार मुद्देनिहाय तपशील जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी द्यावा असे मौखिक आदेश आयोगाने दि.२८.८.२००८ रोजी या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.८.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका श्रीमती हर्षदा शिंदे यांनी श्री.करमरकर यांना माहिती दिली.

जागा मालकाने दिलेला टीडीआर कोणत्या नियमानुसार दिला, त्याची १२ प्रकरणांमधील माहिती नेमकेपणाने दिली जात नाही. गोलमाल स्वरुपाची उत्तरे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दिली आहेत. तसेच मूळ रक्कम १२ टक्के व्याज+५ टक्के सर्व्हिसचार्ज जमा करुन टीडीआर देण्यात आला आहे, असे दिशाभूल करणारे विधान केले आहे. मात्र दिलेल्या माहितीत त्याचा कोणताही खुलासा नाही, अशी तक्रार दि.३०.९.२००८ रोजी श्री.करमरकर यांनी केली. त्यावर आयोगाने जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून खुलासा मागविला. श्री.करमरकर यांनी मागितल्यानुसार निविदा रक्कम +१२% व्याज + ५%सर्व्हिसचार्ज भरुन घेण्याबाबतच्या आदेशाच्या प्रती व स्पष्टीकरणात्मक माहिती श्री.करमरकर यांना देण्यात आली असल्याचा खुलासा जन माहिती अधिकारी नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका श्रीमती हर्षदा शिंदे यांनी केला आहे. अशा प्रकारे टीडीआर देण्यात यावा असा

कोणताही उल्लेख नियमात नाही. नियमात नसताना तो महानगरपालिका आयुक्तांनी कोणत्या अधिकारात दिला, अशी विचारणा श्री.करमरकर यांनी केली आहे. मूळ अर्जावरील उत्तराच्या अनुषंगाने स्पष्टीकरणाची श्री.करमरकर मागणी करीत आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित कार्यपध्दतीनुसार ते योग्य नाही. मात्र त्यांनी नमूद केलेल्या १२ प्रकरणांमधील प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र व स्पष्ट माहिती दिली गेली पाहिजे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) अपीलकर्ता श्री.गजानन वासुदेव करमरकर यांच्या मूळ अर्जानुसार प्रकरणनिहाय तपशिलवार माहिती अपीलकर्त्यास दि.२५.१०.२००९ पर्यंत देऊन अनुपालन अहवाल जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी आयोगास सादर करावा.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१४.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री.आनंद आशेर केदार
ख्रिस्त कुटीर, रिमांड होम समोर,
सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा उपसंचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,
घोले रोड, पुणे ४११ ००१

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी
उपसंचालक व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, घोले रोड, पुणे ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८२/२००९/ सांगली |
| २ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ११/९/२००९ |
| ३ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती - अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने मूळ अर्जात मागणी केलेल्या माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता, श्री.आनंद आशेर केदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब , जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करणे शक्य नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.०९-१०-२००९